# १० . लग्न – पूर्वरंग ( पूर्वतयारी )

लग्न ही प्रत्येकाच्या आयुष्यातील एक महत्वाची घटना असते . लग्नाची सोपी व्याख्या म्हणजे पुरूष व स्त्रीच्या शारीरीक संबंधांना समाजाची मान्यता मिळविण्याचा सोहळा . मला कल्पना आहे की ही रोखठोक व्याख्या वाचून ब-याच मंडळींच्या कपाळावर आठी उमटेल . असो . लग्नाबद्यल तशी तर बरीच मते मांडली जातात . लग्न हा एक जुगार आहे . लग्न हा एक असा लाडू आहे की हा लाडू खाणारा जेवढा पस्तावतो तेव्हढाच हा लाडू न खाणारासुद्धा पस्तावतो . लग्न हा एक दोरीवरचा खेळ आहे . लग्न ह्या विषयाला अशा रितीने शब्दबद्ध करताना माणूस घाबरला नाही तर नवलच .

काहीही असो . लग्न हे आपल्या जन्म मृत्यू दरम्यानच्या प्रवासातील प्रमुख जंक्शन स्टेशन आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही . कारण इथपर्यंतचे एकतर्फी आयुष्य केवळ शिक्षण , नोकरी अशा ट्रॅकवरून चालत असते . स्वतःची काळजी आई वडिलांच्या खांद्यावर टाकलेली असते . परंतु लग्नानंतर सगळेच बदलते . कोणाची तरी जबाबदारी खांद्यावर पडते .
निर्णयक्षमतेची कसोटी लागते . ‘ माणसे ओळखणे ’ हे एक कर्मकठीण काम करावे लागते . तडजोड करणे , नाही ऐकायची सवय बरेच वेळा लग्नानंतरच लागते/ होते . मित्रांनो तुम्हाला घाबरवण्याची माझी मूळीच इच्छा नाही . किंबहूना लग्न ह्या विषयासंबंधी आपली मानसिकता तयार करणे हाच ह्या लेखाचा उद्येश आहे .

लग्न हे दोन व्यक्तिंपुरतेच मर्यादीत रहात नसून हा दोन कुटूंबांचा प्रश्न असतो . पुरूषांसाठी कदाचित लग्न हा मजेचा समारंभ असू शकेल पण एका स्त्रीसाठी मात्र हा वरकरणी मजेचा समारंभ असला तरी मनातील हूरहूर , काळजी , टेंन्शन ती कोणाबरोबर मोकळेपणाने बोलू शकत नाही .

स्वतःचे घर , आईवडिल , भाऊ – बहिण यांना सोडून ती नव-याच्या घरी जाते . तेथे नवरा सोडून तिच्या फारसे परिचयाचे कोणीच नसते . अर्थात नवरा सुद्धा लग्नापूर्वी किती परिचित होतो/ असतो हे सांगणे कठीणच आहे . सूनेने / बायकोने सासरी लवकरात लवकर तडजोड करून सगळयांची मने जिंकावी अशी अपेक्षा असते .पण नवरेमंडळींनी निदान अशी कल्पना करावी की लग्नानंतर आपण बायकोच्या माहेरी रहायला जाणार आहोत व आपला तिथे अनोळख्या जागी कसा निभाव लागेल व त्यानंतरच त्यांना हे किती कर्मकठीण काम आहे याची जाणीव होईल . अर्थात घरजावई होणारे महाभाग आहेतच .

मुलाचे किंवा मुलीचे लग्न वेळेवर व्हावे अशी पालकांची इच्छा व काळजीसुद्धा असते . परंतु माझ्या मते ह्या विषयाची जेवढी पूर्वतयारी करणे गरजेचे आहे तेव्हढी तयारी केली जात नाही . खरेतर SSC पर्यंत शिक्षण झाल्यानंतर मुलाच्या किंवा मुलीच्या हुषारीप्रमाणे पुढील उच्चशिक्षण घेतले जाते पण त्याचवेळी लग्न ह्या विषयाचा जराही विचार केला जात नाही . ही गोष्ट मुलीच्या बाबतीत त्रासदायक होण्याचा संभव असतो . आयुष्यातील लग्न हा एक महत्वाचा टप्पा आहे व त्याची वेळ ही शिक्षण पूर्ण करून नोकरी व्यवसायात ब-यापैकी स्थिरावल्यावर असते . लग्न हे योग्य वयात होणे पुढील आयुष्यासाठी महत्वाचे असते . अर्थात ‘ योग्य वय ’ हे प्रत्येकाला ठरवावे लागते .

पालकांनी आपल्या पाल्याचे शिक्षण चालू झाल्यानंतर , पत्रिका ज्योतिषाला दाखवून लग्नाचा योग कधी आहे हे समजून घ्यावे . पाल्याबरोबर याची चर्चा करण्याची गरज नाही . परंतु ह्यामुळे पाल्याचे पुढील शिक्षण , नोकरी वगैरेसाठी किती वर्षाचा अवधी मिळणार आहे ह्याची कल्पना येईल . अर्थात लग्नाचा काही एकच योग नसतो . परंतु शिक्षण व त्यानंतर नोकरी लागल्यानंतरचा योग नक्की कधी आहे हे कळल्यास पालकांना स्वतःची व पाल्याची मानसिकता तयार करणे सोईचे होईल . हा योग माहीती न करून घेता लग्न जुळवण्याचे प्रयत्न केले तर श्रम फुकटच जातील . पाल्याला विशिष्ट जन्म नक्षत्र असेल तर किती पायपीट करावी लागेल हे जावे त्याच्या वंशा तेव्हाच कळे !

जर का आपला पाल्य प्रेमात पडला नसेल तर विवाहाची पहिली पायरी विवाहमंडळाची चढावी लागते . हल्ली मुलाचे सुद्धा नाव नोंदवले जाते व मुलाकडील मंडळी पण मुलींची स्थळे निवडून प्रयत्न करतात .

नावनोंदणीच्या नमुनापत्रकात एक महत्वाचा रकाना असतो सूनेबद्यल अपेक्षा किंवा जावयाबद्यल अपेक्षा आणि खरेतर गाडी इथेच अडते. कारण ह्या प्रश्नाचा साकल्याने विचारच केलेला नसतो. मग पोकळ शब्दांची माळ गुंफावी लागते. उदा. मनमिळावू , कर्तबगार , गृहकृत्यदक्ष , स्मार्ट , सुंदर वगैरे वगैरे .

ह्या लेखाच्या शेवटी एक जंत्री दिली आहे ज्यायोगे आपल्याला ‘ अपेक्षा ’ शब्दरूप करणे सोईचे होईल. तसेच आपली विविध विषयांवरची ‘ मते ’ काय आहेत हे ही पडताळून पहाता येईल. आपल्या अपेक्षा व मते व्यवस्थित शब्दरूप करणे व त्याचबरोबर आपली तडजोडीची किती प्रमाणात तयारी आहे हे ठरविणे गरजेचे आहे.अपेक्षा ठरवताना किंवा मते बनविताना समोरच्याची सुद्धा काही मते असू शकतात व अपेक्षा असू शकतात ह्याचे भान असणे आवश्यक आहे.

मते व अपेक्षा व्यावहारीक असाव्यात व आपण स्वतः ह्या अपेक्षा किती प्रमाणात पु-या करतो हे बघितल्यास आपण बनविलेल्या यादीतील अतिशयोक्तिचा भाग आपोआपच गळून पडेल अशी अपेक्षा आहे.

प्रस्तावना फारच लांबली. अपेक्षा व मते यांची खालीलप्रमाणे वर्गवारी केली आहे.

१. शारीरीक
२. शिक्षण , बौद्धिक
३. नोकरी व्यवसाय
४. कुटूंब
५. छंद , आवड , सवयी
६. इतर बाबी

अर्थात प्रत्येक मुला / मुलीबरोबर हे सर्व मुद्दे बोलावे अशी अपेक्षा नाही. पण वडिलधा-या मंडळींबरोबर चर्चेतून सुद्धा ब-याच गोष्टी कळू शकतात. परंतु एकदा घरच्यांची प्राथमिक पसंती , ज्योतिषाचा सल्ला सकारात्मक असल्यास , अंतिम पसंतीपूर्वी मुला-मुलींनी एकत्र भेटून ह्या सर्व मुद्यावर मनमोकळी चर्चा करावी व त्यानंतरच आपण चांगले जोडीदार बनू शकतो ह्याची खात्री पटल्यानंतरच अंतिम पसंती द्यावी. या साठी ज्योतिषशास्त्राचा चांगल्या रितीने उपयोग होतो. ह्याच वेबसाईटवर ‘ **Match making what next** ’ ह्या लेखात मार्गदर्शन मिळू शकेल.

मला खात्री आहे कि ह्या मुद्यांना अनुसरून अंतिम निर्णय घेतल्यास एका सुखद विवाहाची नांदी होऊ शकते. अर्थात एक गोष्ट नमूद करू इच्छितो. ह्या सगळया मुद्यांची चर्चा झाल्यानंतर , मते व्यक्त केल्यानंतर सुद्धा माणूस लग्नानंतर बदलू शकतो. दिलेल्या शब्दाप्रमाणे वागत नाही वगैरे गोष्टी घडू शकतात. परंतु ही सर्व चर्चा केल्यानंतर तरूण पीढी अंतिम निर्णय घेण्यापूर्वी आपल्या मनाचा कौल , तडजोडीची तयारी परत एकदा तपासून बघतिल अशी अपेक्षा आहे. म्हणूनच यशस्वी विवाहाची शक्यता माझ्या मते नक्कीच जास्त असेल.

आपण जर का समाज मनाचा कानोसा घेतला तर अनेक सुशिक्षित मुला-मुलींच्या विवाहातील कुरबूरी ऐकू येतील. ह्याचे कारण विवाह जुळण्यासाठी बरेच वेळा दिसणे , पगार वगैरे गोष्टी प्रामुख्याने विचारात घेतल्या जातात. पण लग्न हे दोन भिन्न लिंगी व्यक्तींमधील असल्यामुळे त्यांच्या आवडी , निवडी , मन याचा विचार फार खोलात जाऊन केलेला आढळत नाही. मी तर म्हणेन की लग्नात दोन शरीरांच्या मिलनाबरोबरच दोन मनांच्या मिलनाचा संगम अपेक्षित आहे.

ह्या बाबतीत ज्योतिषशास्त्राचा चांगला उपयोग होऊ शकतो हे मी ज्योतिषशास्त्राचा अभ्यासक म्हणून मुद्दाम नमूद करू इच्छितो. अर्थात तुम्ही किती विद्वान ज्योतिषाकडे जाता यावर हे अवलंबून आहे. तसेच तुमचा ह्या शास्त्रावर पूर्ण विश्र्वास असेल तरच असे करा. त्याचप्रमाणे ज्योतिषकथन स्वीकारण्याची मनाची तयारी आहे का याचाही कानोसा घ्या. असो. ज्योतिषशास्त्राचा कसा उपयोग होऊ शकतो हे थोडक्यात सांगतो.

ह्या वेबसाईटवर ‘ **Astrology** ’ ह्या सेक्शन मध्ये व्यक्तीमत्व ओळखण्याचे ठोकताळे दिले आहेत. तसेच नावावरून, जन्मतारखेवरून ह्या व्यक्तींचा ( **Ruling Planet** ) अधिपती कोण व त्या व्यक्तीचे कोणाबरोबर पटते हे सुद्धा कळू शकेल. ह्या व्यतिरिक्त पत्रिकेतील १२ स्थानांवरून त्या व्यक्तीची बरीच ओळख होऊ शकते. जर का घरातील वडिलधाऱ्या मंडळींना ज्योतिषशास्त्राचे ज्ञान किंवा तोंडओळख असेल तर त्या अनुषंगाने चर्चेच्या ओघात माहिती मिळविता येऊ शकते. असो.

पत्रिकेतील १ ले स्थान ः ( लग्न स्थान ) व्यक्तीमत्व, स्वभाव, आरोग्य कळू शकते.
पत्रिकेतील २ रे स्थान ः ( धनस्थान ) पैसा, संपत्ति विषयी मार्गदर्शन मिळते.
पत्रिकेतील ३ रे स्थान ः ( पराक्रम ) भावंडे, प्रवास वगैरे.
पत्रिकेतील ४ थे स्थान ः ( गृहस्थान ) आई, घरातील वातावरण, घर, वाहनसुख
पत्रिकेतील ५ वे स्थान ः ( संतती स्थान ) संतती, शिक्षण, प्रेमविवाह वगैरे.
पत्रिकेतील ६ वे स्थान ः ( शत्रुस्थान ) आरोग्य, होणारे रोग, शत्रु, नोकरी, मामा वगैरे.
पत्रिकेतील ७ वे स्थान ः ( जायास्थान ) नवरा / बायको, शरीरसुख वगैरे., प्रेमविवाह.
पत्रिकेतील ८ वे स्थान ः ( मृत्यूस्थान ) रोग, मृत्यूचे कारण वगैरे.
पत्रिकेतील ९ वे स्थान ः ( भाग्यस्थान ) परदेशप्रवास, भाग्योदय कधी ?
पत्रिकेतील १0 वे स्थान ः ( पितृस्थान ) वडिल, नोकरी, व्यवसाय.
पत्रिकेतील ११ वे स्थान ः ( लाभेश ) सर्व प्रकारचे ऐहीक लाभ.
पत्रिकेतील १२ वे स्थान ः ( व्ययेश ) धार्मिक पींड, जीवनातील वजा बाजू.

अर्थात प्रत्येक पत्रिकेचा एवढा खोलवर अभ्यास शक्य नाही ह्याची मला कल्पना आहे.

परंतु सुखकर विवाहासाठी ज्योतिषशास्त्राची मदत होऊ शकते एवढेच मला सांगावयाचे आहे. तसेतर अक्षरावरून सुद्धा व्यक्तीमत्वाचे बरेच अंदाज सहजपणे कळू शकतात. तसेच ‘ देहबोलीवरून ’ सुद्धा माणसाचे मन कळू शकते. ह्याच वेबसाईटवरील **Graphology** आणि **Interpretation of Body language** ची माहीती वाचावी.

मला खात्री आहे कि वरील विवेचनाप्रमाणे विचार केल्यास तुम्हाला मनमिळावू जोडीदार नक्की मिळेल. तुमच्या वैवाहिक सुखासाठी शुभेच्छा !!!

११.0 जोडीदाराकडून असलेल्या अपेक्षा स्वतःची मते

| १.0 | शारिरीक ः | अपेक्षा, मते | तडजोड |
|---|---|---|---|
| १.१ | उंची, किंवा उंचीतील फरक | | |
| १.२ | वजन | | |
| १.३ | बांधा | | |
| १.४ | वय / वयातील अंतर | | |
| १.५ | वर्ण | | |
| १.६ | चष्मा, **Contact Lens** | | |
| १.७ | **Blood group** | | |
| १.८ | लहानपणापासूनचे आजार, **MC.** | | |
| १.९ | केस. | | |
| १.१0 | कपडे कोणते वापरावे ? | | |
| | | | |

| २.0 | शिक्षण ः | अपेक्षा , मते | तडजोड |
|---|---|---|---|
| २.१ | शिक्षण किती असावे ? | | |
| २.२ | कोणत्या शाखेतील ? | | |
| २.३ | व्यावसायिक शिक्षणाचे माध्यम | | |
| २.४ | व्यावसायिक शिक्षण | | |
| २.५ | शिक्षण अपूर्ण असल्यास किंवा पुढे शिकायचे असल्यास | | |
| | | | |

| ३.0 | नोकरी ः | अपेक्षा , मते | तडजोड |
|---|---|---|---|
| ३.१ | नोकरी कशी असावी ? सरकारी , खाजगी क्षेत्र , बॅंक , विमा , वगैरे . | | |
| ३.२ | पगार | | |
| ३.३ | कामाच्या वेळा | | |
| ३.४ | हुद्या | | |
| ३.५ | नोकरीचा कालावधी | | |
| ३.६ | नोकरी किती वर्षे करावी लागेल ? ( मुलीला) | | |
| ३.७ | नोकरी लग्नानंतर जमेल का ?( मुलीला) ( राहण्याचे ठिकाण बदलणार असल्याकारणाने ) | | |
| ३.८ | आर्थिक व्यवहार | | |
| ३.९ | परदेशी / नोकरीसाठी जायची तयारी | | |
| ३.१0 | व्यावसायिक जबाबदारी चालू ठेवावी का ? | | |
| ३.११ | करीयर करणारी ( मुलीच्या बाबतीत ) | | |
| ३.१२ | नोकरी सोडायची तयारी आहे का ?( मुलीसाठी ) | | |
| ३.१३ | नोकरीचे ठिकाण सासरपासून लांब असल्यामुळे नोकरी सोडावी लागली तर दुसरी नोकरी मिळू शकेल का ? | | |
| | | | |

| ४.0 | जोडीदाराचे कुटूंब ः | अपेक्षा , मते | तडजोड |
|---|---|---|---|
| ४.१ | स्वतःच्या शहरातील किंवा जवळील शहरातील | | |
| ४.२ | दुस-या राज्यातील चालेल का ? | | |
| ४.३ | आर्थिक दर्जा कसा असावा | | |
| ४.४ | भाऊ , बहिणी वगैरे . | | |
| ४.५ | आई वडिलांचे शिक्षण , हुद्या | | |
| ४.६ | जात , पोटजात | | |
| ४.७ | परधर्मातील चालेल का ? | | |
| ४.८ | एकत्र राहण्याची ‘ तयारी ’ ( मुली साठी ) | | |
| ४.९ | विभक्त कुटूंब / एकत्र कुटूंब | | |
| ४.१0 | एकूलता / एकूलती एक चालेल का ? | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ४.११ | उत्तर हो असेल सासरची जबाबदारी घ्यायची तयारी आहे आहे का ? | | |
| ४.१२ | कुटूंबातील वातावरण – धार्मिक , पुढारलेले | | |
| ४.१३ | व्रतवैकल्पाच्या अपेक्षा , उपास वगैरे . | | |
| ४.१४ | माहेरी बायकोने पैसे दिले तर चालतील का ? | | |
| ४.१५ | कर्ज विषयक तपशील | | |
| ४.१६ | मुलीने कर्ज घेतले असल्यास परतफेड मान्य आहे का ? | | |
| ४.१७ | गुंतवणूक ? | | |
| ४.१८ | घरासाठी कर्ज असल्यास किंवा लग्नानंतर घर घेणार असल्यास, बायकोकडून आर्थिक हातभार ? | | |
| | | | |

| ५.0 | छंद , आवडीनिवडी , सवयी ः | अपेक्षा , मते | तडजोड |
|---|---|---|---|
| ५.१ | घरकामाची सवय | | |
| ५.२ | स्वयंपाक येतो का ? | | |
| ५.३ | कला ( गायन , चित्रकला , नाच वगैरे , खेळ ) | | |
| ५.४ | पुढील कलाशिक्षण ( मुलीचे बाबतीत ) | | |
| ५.५ | लाइफ स्टाईल | | |
| ५.६ | स्वयंपाक करायला आवडतो का ? ( मुलीच्या बाबतीत ) | | |
| ५.७ | कोणते कपडे आवडतात ? | | |
| ५.८ | लग्नापूर्वी साकार न झालेली स्वप्ने , ध्येय . | | |
| ५.९ | करमणुकीच्या कल्पना | | |
| ५.१0 | TV ची आवड , सिनेमा , नाटक , संगीत मैफल . | | |
| ५.११ | Treaking ची आवड , फिरण्याची आवड , हॉटेलात जेवणे , Shopping. | | |
| ५.१२ | घरकाम येते का ? आवडते का ? | | |
| ५.१३ | सवयी दुस–याला न आवडणा–या ? | | |
| ५.१४ | दिनचर्या ? | | |
| ५.१५ | व्यसने ? | | |
| ५.१६ | शाकाहारी – मांसाहारी ? | | |
| ५.१७ | वाचनाची आवड | | |
| | | | |

| ६.0 | इतर बाबी ः | अपेक्षा , मते | तडजोड |
|---|---|---|---|
| ६.१ | पत्रिका बघावयाची आहे का ? | | |
| ६.२ | फक्त गुणमिलन कि फलज्योतिष , मंगळ आहे का ? | | |
| ६.३ | लग्न कसे करावे ? वैदिक , धार्मिक कि नोंदणीपद्धतीने ? | | |
| ६.४ | पासपोर्ट आहे का ? | | |
| ६.५ | हुंडा , वरदक्षिणा | | |
| ६.६ | सहचर नेमका कसा पाहिजे ? मित्र , सांभाळून घेणारा , टिकाकार , होयबा ? | | |
| ६.७ | स्वभाव ः सभाधीट , एकलकोंडी / एकलकोंडा | | |
| ६.८ | संतती बद्यलच्या अपेक्षा | | |
| ६.९ | अग्रक्रम अपेक्षित ? ( शिक्षण , नोकरी , कुटूंब , मुले ) | | |
| ६.१0 | बायकोचे मित्र , नव-याच्या मैत्रिणी यांचेबरोबर लग्नानंतर कसे संबंध राहावेत ? | | |
| ६.११ | वाहन चालवता येते का ? | | |
| ६.१२ | नसल्यास , वाहन चालावेण्याचे शिक्षण घेणार का ? | | |
| ६.१३ | निर्णयक्षमता | | |
| ६.१४ | व्यक्तीस्वातंज्य | | |
| | | | |